# ‘जन’आरोग्याच्या दिशेने
# ‘जन आरोग्य समिती’




Support for Advocacy and Training to Health Initiatives
साथी

# प्रस्तावना

'आयुष्मान भारत (आभा)' अंतर्गत, गावस्तरावरील आरोग्य उपकेंद्र (Sub center) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र (पी.एच.सी)चे सर्वांगीण आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये (Comprehensive Primary Health Center (PHC) रूपांतर झाले. महाराष्ट्रात मार्च २०२२ पर्यंत सर्वच स्थानिक आरोग्य संस्थांचे रूपांतर आरोग्यवर्धिनी केंद्र म्हणजे 'हेल्थ अँड वेलनेस सेंटर' (HWC) केले गेले. जानेवारी २०२४ नंतर सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रांना 'आयुष्यमान आरोग्य मंदिर' असे म्हटले जात आहे.

आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत, खास करून जनतेस प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, पुर्नवसन आणि वृद्धत्व काळातील काळजी (Palliative Care) या संबंधित प्राथमिक आरोग्य सेवां-सुविधा देण्याचा पहिला टप्पा गाठला जातोय. या पहिल्याच टप्प्यात गावातील / गावासाठी असलेल्या आरोग्य संस्थेस सक्षम करण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने 'जनते'ची आहे. याची जाणीव करून देण्यासाठी सर्वच आरोग्यवर्धिनी केंद्राच्या ठिकाणी 'जन आरोग्य समिती'ची (JAS) बांधणी होत आहे. याची प्राथमिक जबाबदारी सर्वच तालुके आणि जिल्ह्यातील प्रशासकीय पातळीवर दिली आहे. जेणेकरून, आरोग्यवर्धिनीत सामाजिक आरोग्यासाठी एकत्रित कृती करणे, लोकप्रतिनिधी अथवा जनप्रतिनिधींचा आरोग्य केंद्रातील सहभाग वाढवणे, आरोग्यवर्धिनी केंद्रातील कारभारात लक्ष घालून रुग्णकेंद्रित सेवा-सुविधा बळकट करणे, सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण करणे, स्थानिक आरोग्याच्या निधींच्या विकेंद्रित नियोजनात आणि ऑडिट प्रक्रियेत प्रत्यक्ष लोकसहभाग निर्माण करून कारभार पारदर्शक ठेवणे. इत्यादींसाठी गावातच आवश्यक पावले उचलले जातील.

आयुष्मान भारत अंतर्गत, प्राथमिक आरोग्य केंद्रातील 'रुग्ण कल्याण समिती'चे आरोग्यवर्धिनी केंद्र जन आरोग्य समिती (JAS-PHC) म्हणून विस्तारित सुधारणा झाली. शासकीय मार्गदर्शक सूचनांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व जन आरोग्य समितीची रचना आणि भूमिका यात थोड्या प्रमाणात बदल आहे. मात्र समितीच्या कामाचे तत्त्व समान आहे.

समितीच्या नावाप्रमाणे बघितले तर, रुग्ण कल्याण समितीत 'रुग्ण' केंद्रित कल्याण अशा स्वरूपाच्या सेवा-सुविधा डोळ्यासमोर येत होत्या मात्र, नवीन समितीच्या बदलामुळे 'जनता' केंद्रित सेवा-सुविधा देण्यावर सर्वात जास्त भर समितीकडून दिला जाईल.


या अनुषंगाने आम्ही या पुस्तिकेत आरोग्यवर्धिनी केंद्र व जन आरोग्य समितीची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आमचा हा प्रयत्न या समित्यांसाठी नक्कीच उपयोगी ठरेल याची आम्हास खात्री आहे.


हेमराज पाटील

राज्य समन्वयक संस्था (कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ)



नमस्कार सरपंच ताई,





अरे, रमेशभाऊ तुम्ही! काय काम काढलं आज.

पैशांची नड होती जरा. बापुंच्या बीपीच्या गोळ्या आणायच्यात.

मग त्याला पैशे कशाला पायजे? गावच्या आरोग्यवर्धिनीत घेऊन जा त्यांना. तिथं मोफत हायेत बीपीच्या गोळ्या.

आरोग्यवर्धिनी म्हणजे उपकेंद्राचा दवाखाना म्हणताय का तुम्ही?

हं तेच. तिथं तुला बीपी, डायबेटीसची मोफत दवा भेटल.

काय सांगता सरपंचताई, वर्ष झालं मी मेडिकलमधून पैसं देऊन आणतोया.

गावचा सरकारी दवाखाना काय पुजायचाय? गेलं त गेलं. आता पुढं ध्यानात ठेव.

पुढं नाऽऽय, आत्ताच नेतू की म्हाताऱ्याला.

आता नाय उपयोग. दुपारी बंद असतंय. उद्या सकाळी ९ ते १२ मध्ये जा.

जातोच. लै कामचं बोलल्या बघा सरपंच तुम्ही. पण तुम्हाला हे समद कसं माहीत?

अरे बाबा मी त्या आरोग्यवर्धिनी केंद्राच्या जन आरोग्य समितीची अध्यक्ष आहे.

जन आरोग्य समिती? ती काय असते?

ते सांगण्यासाठीच ग्रामसभा लावणारे. त्यात आरोग्यवर्धिनी केंद्राची आणि जन आरोग्य समितीची माहिती देणार आहे. तुम्ही पण या ग्रामसभेला. आणि आपल्या गावातील जेवढे पण बीपी डायबेटीसचे पेशंट आहेत ना! त्यांना पण निरोप द्या.

विषयच नाही सरपंच! त्यांच्यासाठी तर लैच महत्त्वाचं आहे हे. आताच कामाला लागतो बघा. उपकेंद्राच्या आरोग्यवर्धिनी केंद्रात जाऊन पहिले सर्व बीपी डायबेटीसचे पेशंटची लिस्ट घेतो. आणि घरोघरी जाऊन निरोप देतो की नाय बघा मी!

रमेशभाऊ तुमच्यासारखे गाव आरोग्य समितीचे मेंबर जर या समितीवर आले ना तर ही समिती सुसाट काम करंल.

या मग रमेशभाऊ, काम खोळंबलीत. ग्राम सेवकाला बोलावलंय ग्रामसभेच्या तयारीसाठी.



# ग्रामसभेचा दिवस



नमस्कार मंडळी,

मी आजच्या ग्रामसभेत गावची सरपंच या नात्यानं तुम्हा सर्वांचं मनापासून स्वागत करते. खूप दिवसांपासून तुमच्याशी बोलायचा विचार करत होते. कारणही तसंच महत्त्वाचं होतं बघा! आपल्या गावात 'सरकारी दवाखाना' म्हणजे 'आरोग्य उपकेंद्र' आहे हे तुम्हाला सर्वांनाच माहिताय! त्याबद्दल जरा तुमच्याशी बोलायचं होतं. आता या '**आरोग्य उपकेंद्राला**' '**आरोग्यवर्धिनी केंद्र**' पण म्हणतात बरं का! चार-पाच गावं मिळून एक उपकेंद्र असतं. आणि त्याच्या वरती असतं प्राथमिक आरोग्य केंद्र.



आपल्या या आरोग्यवर्धिनी केंद्रात, **एक आरोग्य सेवक, एक आरोग्य सेविका आणि समुदाय आरोग्य अधिकारी** आता नियमितपणे आरोग्य सेवा देतात. या 'समुदाय आरोग्य अधिकारी' यांना 'सीएचओ' असंही म्हणतात. दुपारी १२ पर्यंत सीएचओ स्वत: रुग्णांची तपासणी करतात. तर दुपारून आरोग्यवर्धिनी केंद्राच्या गावांमधील वाड्या-वस्त्यावर स्वत: जाऊन आरोग्य विषयक मार्गदर्शन करतात आणि उपचार पण करतात.



आपल्या आरोग्यवर्धिनी केंद्राचे कामकाज नीटपणे सुरू राहावं म्हणून आरोग्यवर्धिनी केंद्रात सरकारतर्फे 'जन आरोग्य समिती' स्थापन केली आहे. या समितीची मी अध्यक्ष आहे बरं का! कारण मी या आरोग्यवर्धिनी केंद्राच्या गावची सरपंच आहे ना! तसं हे **अध्यक्ष पद दर दोन वर्षांनी दुसऱ्या गावच्या सरपंचाला दिलं जातं.** फक्त ते गाव त्या आरोग्यवर्धिनी केंद्राच्या अंतर्गत असलं पाहिजे.

**थोडक्यात काय तर...**

- **गावचा सरपंच हा या 'जन आरोग्य समिती'चा अध्यक्ष असतो.**




- आणि **सह अध्यक्ष असतात प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी.**




- तुम्हाला माहीतच आहे की सचिवाशिवाय ही समिती कामकाज करूच शकत नाही. आणि ही **सचिवाची जबाबदारी उत्तमरित्या पेलू शकतात ते म्हणजे आपले आरोग्यवर्धिनी केंद्राचे सीएचओ.**




- या जन आरोग्य समितीमध्ये **उपकेंद्र आरोग्यवर्धिनी केंद्राअंतर्गत असणाऱ्या इतर गावातील सरपंच, ग्राम आरोग्य, पोषण आणि स्वच्छता समितीचे सदस्य-सचिव, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका/सेवक (नर्सताई, एमपीडब्लू)** हे पदावरील लोक पण सदस्य असतात. त्यांना सरकारी भाषेत पदसिद्ध सदस्य असं म्हणतात.





- **महिला बचत गटाच्या अध्यक्ष, शालेय आरोग्य दूत / विद्यार्थी प्रतिनिधी, समन्वयक शिक्षक / कार्यक्षेत्रातील वरिष्ठ सहशिक्षक, युवा प्रतिनिधी, क्षयरोग म्हणजे टीबीमुक्त रुग्ण, ज्यांनी दोन मुलानंतर नसबंदी केली आहे त्यापैकी कोणताही एक पुरुष** हे इतर सर्वसामान्य/अशासकीय सदस्य गटातून या समितीचे सदस्य असतात.

- जन आरोग्य समितीच्याच एका वर्षात किमान दहा बैठका होणे बंधनकारक आहे.
- गेल्या महिन्यातील अबंधित निधी खर्चाचा आढावा आणि पुढील महिन्यासाठी निधीचे मासिक नियोजन दर महिन्याला एक असा अजेंडा फिक्स असेल.
- इतर मान्यवर सदस्यात गाव आरोग्य, पोषण आणि स्वच्छता समितीचे अध्यक्ष/ सदस्य असतील परंतु त्यांचा कार्यकाल संपला असल्यास त्यांना जन आरोग्य समितीचे सदस्य पदावर राहता येणार नाही.
- किमान ५०% महिलांना या जन आरोग्य समितीत सदस्य दिले जाईल याची काळजी घ्यावी.

## तर मंडळी, आता मी 'जन आरोग्य समिती'ची 'कार्ये आणि जबाबदाऱ्या' काय असतात ते सांगते...



या समितीची आम्ही **दर महिन्याला बैठक** घेतो. म्हणजे वर्षातून दहा बैठका घेणं हे आमच्यावर बंधनकारकच आहे. या बैठकीत आम्ही **आरोग्य–वर्धिनी केंद्राचा** म्हणजेच आरोग्य **उपकेंद्राच्या कामाचा आढावा** घेतो. इमारत देखभाल दुरुस्ती, औषधे, जन आरोग्य समितीला मिळालेल्या निधीचे नियोजन कसं करायचं? ग्राम पंचायतीला मिळणाऱ्या १५ व्या वित्त आयोग आणि आदिवासी भागात 'पेसा निधी'तून गावच्या आरोग्यासाठी काय काय काम करता येतील त्याचं नियोजन कसं करायचं? या सर्व मुद्द्यांविषयी आम्ही चर्चा करतो आणि निर्णय घेतो.



एकदा, आपल्या **जन आरोग्य समितीतल्या विद्यार्थी प्रतिनिधीने** आमच्याकडे एक प्रश्न मांडला. ''त्यांच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत स्वच्छतागृहाच्या दुरुस्तीचा मुद्दा खूप दिवसांपासून पडून होता. शाळेतल्या मुलांचं ऐकणार कोण? पण बैठकीत ही मुलं नियमित येत होती. त्यांनी पाहिलं की इथं प्रश्न सुटतात. मुलांनी धाडस करून हा मुद्दा बैठकीत सांगितला. स्वच्छतागृह स्वच्छ नसेल तर त्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होणारच. शाळेची ही समस्या आठ दिवसात सोडवली. त्यासाठी १५ व्या वित्त आयोगातल्या निधीचा वापर केला.''




अजून एक घटना सांगते, ''आपल्या आरोग्यवर्धिनी केंद्राच्या अंतर्गत जितके गावं येतात त्या गावातल्या गरोदर महिलांसाठी तपासणीची सोय नव्हती. त्याच्यासाठी वेगळ्या खोल्या बांधून घेतल्या. त्यासाठी **पुन्हा ग्रामपंचायतीला मिळालेल्या १५ व्या वित्त आयोगाचा वापर केला.''**

इथून पुढंही आपलं हे आरोग्यवर्धिनी केंद्र अजून चांगल्यात चांगले कसं होईल यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी गावातील लोकांची साथ खूप महत्त्वाची आहे. तुम्ही वेळोवेळी जन आरोग्य समितीला सूचना देत जा. आम्ही त्यानुसार काम करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करू. लोकांच्या खास सहभागाशिवाय आपलं आरोग्यवर्धिनी केंद्र मजबूत होऊ शकत नाही. आरोग्य विभागासोबत आपल्यालाही आता या आरोग्यवर्धिनीची काळजी घ्यावी लागेल. आपण सर्वांनी मिळून हे **आरोग्यवर्धिनी केंद्र जर सक्षम केलं तर आपल्या गावातून बाहेर जाणारा पैसाही वाचेल.**




आपल्या गावातील महिला व बालक, वृद्ध लोकं, टीबी, दमा, शुगर, बीपी, कॅन्सर, एचआयव्ही, मानसिक आजारी पेशंट, कुपोषित बालके, दिव्यांग व्यक्ती अशा आणि इतर असाध्य आजारांच्या पेशंटला या आरोग्यवर्धिनी केंद्राचा खूप मोठा आधार मिळणार आहे. **आता, आरोग्यवर्धिनी केंद्रात बीपी, डायबेटीससारख्या आजारांवर मोफत उपचार आणि औषधे मिळू लागले आहेत.**

ई-संजीवनी मार्फत आरोग्य विषयक चांगले मार्गदर्शन मिळू लागले आहे. मोठ्या आजारांचे अगोदरच निदान होण्यास मदत होत आहे. त्यामुळे पेशंटवर वेळेत उपचार होतील आणि धोकाही टळेल. शिवाय गावातच आरोग्याची चांगली सुविधा उपलब्ध झाल्यामुळे साध्या-साध्या आजारासाठी तालुक्याला जाण्याचा आपला त्रास आणि औषधांवरचा खर्चही वाचणार आहे.




पण यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्राला आपलं समजून त्याच्या कामकाजावर लक्ष ठेवावं लागणार आहे. तिथल्या सीएचओ, आरोग्य कर्मचारी यांना सहकार्य करावं लागणार आहे. उपकेंद्राचे कामकाज चांगलं चालावं म्हणून स्थापन झालेली 'जन आरोग्य समिती' अजून चांगलं काम कसं करेलं यासाठी प्रयत्न करावे लागतील. आपल्या प्रत्येक ग्रामसभेत आरोग्यवर्धिनी केंद्र आणि आरोग्याविषयी चर्चा झाली पाहिजे, याची आपण सर्वांनी खबरदारी घेतली पाहिजे.

## ‘जन आरोग्य समिती’ने कोणत्या गोष्टींवर देखरेख करायची?




- आरोग्यवर्धिनी केंद्रात पुरविल्या जाणाऱ्या आरोग्यविषयक सेवांची यादी आहे का?

  त्या सेवांची माहिती आरोग्यवर्धिनी केंद्रात लावली गेली आहे का? याची खात्री करणे. उदाहरणार्थ गंभीर आजार, डोळे, कान, नाक या आजारावरील उपलब्ध सेवा व तपासण्या.




- गर्भवती महिला, स्तनदा माता, बालके आणि किशोरवयीन मुले यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या सेवा यासाठी शिबिरांचे आयोजन करणे.









- आरोग्यवर्धिनी केंद्रात योग शिबिरांचे आयोजन केले जाईल याची खात्री करणे.
- आरोग्यवर्धिनी केंद्रात सुरक्षित पिण्याचे पाणी, आहार, कचरा व्यवस्थापन, मुक्त परिसर, स्वच्छ शौचालय, स्वच्छ चादरी-बेडशिट्स, पडदे, रुग्ण व नातेवाईकांना बसण्यासाठी स्वच्छ प्रतीक्षालये, केंद्रातील सुरक्षा, बायो मेडिकल वेस्ट, कचऱ्याची नियमित विल्हेवाट नीट होते की नाही तसेच योग्य दिशादर्शक फलके लावण्यात आल्याची खात्री करणे.
- आरोग्यवर्धिनी केंद्रात दिल्या जाणाऱ्या कोणत्याही आरोग्य सेवांसाठी केसपेपर व्यतिरिक्त कोणतीही फी आकारली जाणार नाही याची खात्री करणे.
- आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये मैत्रीपूर्ण वातावरण राहील याची खात्री करणे.
- आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर अत्यावश्यक औषधी यादी व आजाराचे निदान याबाबत माहिती व त्यानुसार उपचार मिळण्याची खात्री करणे.
- आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर समाजातील गरीब व असुरक्षित घटकांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागू नये, त्यांना त्यांच्या भेटीच्या वेळी सेवा नाकारली जाणार नाही याची खात्री करणे.
- समितीत आलेल्या नवीन सदस्यांना समितीविषयी; समितीच्या भूमिका-जबाबदाऱ्या आणि आरोग्य क्षेत्रातील नवनवीन बदलांबद्दल माहिती देत राहणे.



आरोग्यवर्धिनी केंद्राला सोशल मीडिया आणि डिजिटल जनसंपर्क वापरण्यास प्रोत्साहित करणे.

आपल्या सीएचओ मार्फत गाव भेटी होतात की नाही याची खात्री करणे.



## आरोग्यवर्धिनी केंद्रात मिळणाऱ्या सेवा



- असंसर्गजन्य आजारांवर उपचार
- मानसिक आरोग्य
- योगा उपचार पद्धती
- तोंडाचा, स्तनाचा, गर्भाशयाच्या कर्करोगावर प्राथमिक निदान
- आयुर्वेद, युनानी, होमेओपॅथी उपचार इ.



प्रसूतिपूर्व प्रसूती सेवा



नवजात अर्भक व नवजात शिशूंना आरोग्य सेवा



बाल्यावस्था किशोरवयीन आरोग्य सेवा



लसीकरण




मधुमेह



उच्च रक्तदाब



कुटुंब नियोजन गर्भनिरोधक व प्रजनन संबंधित आरोग्य सेवा



सामान्य संसर्गजन्य रोगांची बाह्य रुग्ण सेवा

## वार्षिक जन आरोग्य संवाद आणि ऑडिट / सेवा-सुविधा इत्यादींचा खर्चासह आढावा घेणे.



**वर्षाच्या शेवटी पेशंटची मते जाणून घेणे तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रांत मिळणाऱ्या सेवांचे सोशल ऑडिट करणे.** आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत झालेल्या चांगल्या अथवा सुधारणांसाठी वाव असलेल्या कामांची दखल घेणे. या उद्देशाने **'जन आरोग्य समिती'ने दरवर्षी सार्वजनिक 'जन आरोग्य संवाद' आयोजित करावा.** तसेच आरोग्य सेवा-सुविधा देत असताना जनतेचा सहभाग कसा राहिला या संदर्भात संवादातून आपली बाजू मांडावी.

या कार्यक्रमामुळे गाव/खेड्यातून विशेषत: समाजातील वंचित, असुरक्षित घटक आणि त्यांच्या क्षेत्रांतर्गत असलेल्या पंचायतींमधून सक्रिय सहभाग वाढण्यास मदत होईल. संवाद कार्यक्रम योग्य वेळी झाला पाहिजे. जनसंवादात, लोकांद्वारे व्यक्त केलेल्या समस्या किंवा त्रुटीची दखल घेण्याची जबाबदारी समिती आणि प्रशासनाची असेल.

## तक्रार निवारणात 'जन आरोग्य समिती'ची भूमिका काय असेल?

**अ. तक्रार नोंदविण्यासाठी यंत्रणा बसविली असल्याची खात्री करून घेणे. (आरोग्य सेवांबद्दल रुग्णांची मते नोंदवणे, रुग्णांच्या समाधानाच्या सर्वेक्षणानुसार नोंदविली गेल्यास ठरलेल्या वेळेत त्या तक्रारीचे निराकरण करणे.)**




आरोग्यवर्धिनी केंद्राच्या गावांमध्ये तक्रार करण्याच्या प्रक्रियेची मोठ्या प्रमाणावर जाहिरात झाली पाहिजे.

- यामुळे जन आरोग्य समितीस नियमितपणे आलेल्या तक्रार निवारणाचे काम पूर्ण क्षमतेने करता येईल आणि आरोग्यवर्धिनी केंद्राचे कामकाज सुधारेल.



**आ) जन आरोग्य समितीच्या प्रत्येक बैठकीत आरोग्य सेवा सुधारण्यासाठी रुग्ण किंवा आरोग्य सेवा घेणाऱ्याच्या समस्या जाणून घेतल्या जातील. त्यात सर्व सदस्यांनी आपआपले मत नोंदवून त्यांची योग्य ती कारवाईची व्यवस्था करावी.**

इ) आरोग्यवर्धिनी केंद्रातील व गाव पातळीवरील आरोग्य सेवांविषयी जन आरोग्य समिती ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे मत घेऊन पुढील कार्यवाही करतील.

ई) आरोग्यवर्धिनी केंद्राच्या आरोग्य सेवकांसाठीसुद्धा ही समिती तक्रार निवारण म्हणून काम करेल याची खात्री करावी.

उ) रुग्ण/नातेवाईकांकडून आलेल्या तक्रारींना योग्य प्रतिसाद देणे, तक्रार निकाली निघाली नसल्यास वरिष्ठ पातळीवर पाठवणे.

## आरोग्यवर्धिनी केंद्रातील 'अबंधित निधी'चा वापर कसा करायचा?



- रुग्णांना व जनतेस मूलभूत सुविधा व सेवांची खात्री करून देणे, गावात आरोग्याच्या सेवा-सुविधा आणि योजना इत्यादींच्या जाणीव जागृतीस मदत करणे या हेतूने अबंधित निधीतून खर्चास प्राधान्य देणे. जेणेकरून स्थानिक गरजा व प्राधान्यक्रम यावर आधारित खर्च केला जाईल.


- आरोग्यवर्धिनी उपकेंद्रास दरवर्षी रु. ५०,०००/– तर प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्रासाठी रु. १,७५,०००/– या प्रमाणात अबंधित निधी दिला जातो. मुख्यत: स्थानिक आरोग्यवर्धिनी केंद्रातील गरजा पूर्ण करण्यासाठी दरवर्षी दिला जाईल. (दरवर्षी नियोजन कृती आराखड्यानुसार निधी वितरणात बदल होऊ शकतो).
- जन आरोग्य समितीशी सल्लामसलत करून आरोग्यवर्धिनी केंद्र पातळीवर घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर, अत्यावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी अबंधित निधीचा वापर करता येईल. अबंधित निधी हा एक लवचिक (flexible fund) निधी म्हणून दरवर्षी उपलब्ध करून दिला जातो.
- राज्यस्तरीय मार्गदर्शक सूचनेनुसार, 'जन आरोग्य समिती' जिल्हा आरोग्य सोसायटी (District Health Society)चा एक घटक म्हणून काम करेल, त्यासाठी स्वतंत्र नोंदणीची आवश्यकता नाही. पंचायतराज प्रतिनिधी / स्थानिक नागरी स्वराज्य संस्था, स्थायी समित्या ह्या जन आरोग्य समितीशी संलग्न भूमिकेत राहतील.

## आरोग्यवर्धिनी केंद्रातील निधी कोणत्या बाबींवर खर्च करता येईल?

- मनुष्यबळ खर्चाव्यतिरिक्त आरोग्यवर्धिनी उपकेंद्राच्या परिसर स्वच्छतेसाठी लागणाऱ्या उपयोग्य वस्तूंशी संबंधित खर्च.
- वॉशरूम आणि शौचालय येथील स्वच्छता विषयक व्यवस्थेशी संबंधित खर्च. (उदा. Toilet क्लीनर, फ्रेशनर वगैरे..)
- आरोग्यविषयक प्रोत्साहन दिवस आणि रुग्ण हिताचे उपक्रम (उपकरणे खरेदी वगळता) आयोजित करण्याच्या संबंधित खर्च.





- सेप्टिक टाक्या / शौचालयांच्या किरकोळ दुरुस्तीशी संबंधित खर्च.
- दिशा दर्शक फलके/ चिन्हाशी संबंधित खर्च.



- रुग्णांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची तरतूद करण्याशी संबंधित खर्च.



- कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीच्या व्यवस्थेशी संबंधित खर्च.

## आरोग्यवर्धिनी केंद्रातील निधी कोणत्या बाबींवर खर्च करता येणार नाही?

- नियमित देखभाल सेवांशी संबंधित खर्च, ज्यासाठी निधी किंवा अनुदान उपलब्ध आहे (वीज, पाण्याचे बिले, टेलीफोन बिले इ.)
- मनुष्यबळ/व्यक्तीगत खर्च. (वाहन चालक, प्रयोगशाळा तत्रंज्ञ, सफाई कामगार इ.)
- महागडी औषधे, निदानात्माक साहित्य/वैद्यकीय उपकरणे इ. खरेदी करता येणार नाहीत.
- राज्य शासनाच्याा विविध कार्यक्रमाद्वारे तरतूद केली आहे अशा वस्तू किंवा उपक्रमास खर्च करता येणार नाही.
- इमारतीचा मोकळा परिसर, बाहेरील व्यायाम शाळा किंवा इतर व्यायामाची उपकरणे/साधने बांधण्यासाठी खर्च करता येणार नाही.
- समितीच्या मान्यतेशिवाय अथवा कोणत्या गोष्टींसाठी निधी खर्च करायचा आहे याचे निर्णय प्रोसिडिंगमध्ये नमूद केल्याशिवाय खर्च केले जाणार नाहीत.

## जन आरोग्य समितीच्या मासिक बैठका पुढील मुद्यांवर असतील.

**१) आरोग्यवर्धिनी केंद्राचा मासिक प्रगतीचा अहवाल**

**२) अबंधित निधीच्या खर्चाचे नियोजन व आढावा**

**३) आरोग्यवर्धिनी केंद्राच्या प्रशासकीय समस्या**

### १) आरोग्यवर्धिनी केंद्राचा मासिक प्रगतीचा अहवाल म्हणजे नेमके काय?

आरोग्य केंद्रामार्फत दिलेल्या सर्व सेवा-सुविधा आणि योजना संदर्भातील सेवा दिल्याचा अहवाल आकडेवारीसह समिती समोर मांडणे, जेणेकरून आपल्या आरोग्यवर्धिनी केंद्रांतर्गत होत असलेल्या उपक्रमांची एकूण स्थिती व प्रगती लक्षात येईल.

### २) अबंधित निधीच्या खर्चाचे नियोजन व आढावा कसा असू शकेल?

आरोग्य केंद्रात मागील महिन्यात झालेल्या खर्चाचा हिशोब मार्गदर्शक सूचनेनुसार 'जन आरोय समिती' घेईल. सोबतच, पुढील महिन्यात खर्चाचे नियोजन देखील तयार करेल. एकूण उपलब्ध निधी आणि अपेक्षित निधी किंवा संसाधने इत्यादींवर चर्चा केली जाईल. झालेल्या निर्णयांचे पालन केले जात आहे याची खात्री करण्यासाठी देखरेखीची भूमिका समिती बजावेल.

### ३) आरोग्यवर्धिनी केंद्राच्या व प्रशासकीय अडचणींवर निर्णय/चर्चा

आरोग्य केंद्रामार्फत सेवा सुविधा देत असताना स्थानिक आरोग्य कर्मचारी यांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागतात. उदा. मासिक प्रगती अहवाल व्यतिरिक्त आरोग्य केंद्रातील समस्या निराकरणासाठी लोकसहभाग वाढवणे, ज्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. आरोग्य केंद्रातील खर्चासाठी पुरेसा निधी नसणे, निधी उशिरा मिळणे इत्यादींमुळे बऱ्याच अडचणी निर्माण होतात.

यासारख्या प्रशासकीय मुद्यांवर समितीच्या बैठकीत देखील चर्चा केली जाईल.

ज्या-ज्या आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये गेल्या तीन वर्षात 'जन आरोग्य समिती' बळकटीकरण प्रक्रिया पूर्ण झाली अशा सर्वच ठिकाणी सकारात्मक बदल सुरू

झालेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पुणे जिल्ह्यातील काही आरोग्य केंद्रांमधील सकारात्मक अनुभव व समिती मार्फत झालेल्या सुधारणा उदाहरणादाखल पुढे बघूया!

# सकारात्मक अनुभव

## ‘जन आरोग्य समिती’मुळे शाळेला नवीन कोरे स्वच्छतागृह मिळाले...

पुणे जिल्हा । भोर तालुका । जांभळी गाव – उपकेंद्र

जांभळी गावातील उपकेंद्रात बीपी, डायबेटीसची औषधं मोफत मिळतात. ही माहिती गावकऱ्यांना नव्हती. गावातलं उपकेंद्र म्हणजेच आरोग्यवर्धिनी केंद्रात बाळंतपणं किंवा लहान मुलांचे लसीकरण होते एवढाच समज होता. उपकेंद्रात बीपी, डायबेटीसची औषधं मिळतात याची माहिती, ग्राम पंचायत सदस्यांकडून आपापल्या गावात होताच लोकांकडून मागणी वाढली. मागणी तितका पुरवठा हा नियम मात्र उपकेंद्राला परवडत नव्हता. कारण जास्तीची औषध खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते. ही अडचण उपकेंद्रातल्या ‘जन आरोग्य समिती’च्या मासिक बैठकीत (जेएएस) मांडली गेली. औषधं ही मूलभूत गरज आहे यावर कुणाचंही दुमत नव्हतं. सरपंचानी पुढाकार घेतला. दोन महत्त्वाचे निर्णय झाले.

पहिला म्हणजे, **ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगातून पाच हजाराचा निधी मंजूर केला. औषध खरेदी झाली आणि गावकऱ्यांचा प्रश्न सुटला.** सोबतच, पुढील वर्षासाठी याच निधीतून ५० हजार रुपये राखून ठेवण्यात यावे असेही ठरवण्यात आले. जेणेकरून त्या निधीद्वारे आरोग्याचे इतरही प्रश्न सोडविण्यास मदत होईल.




समितीत गावातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारे नववीचे दोन विद्यार्थी प्रतिनिधी होते. प्रत्येक बैठकीला ते हजर असायचे. शाळेत पुरेसे स्वच्छतागृह नव्हते, जे होते ते पाण्याअभावी कायम अस्वच्छ असायचे. विद्यार्थ्यांनी शाळेत वेळोवेळी तक्रार केली; शालेय व्यवस्थापन

समितीमध्येही मुद्दा मांडला, तरी त्याचा काही उपयोग होत नव्हता. जन आरोग्य समितीच्या बैठकीनंतर, लोकांच्या आरोग्याचे प्रश्न सुटतात. हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आलं होतं. स्वच्छतागृह स्वच्छ नसतील, प्यायला वा वापरायला पाणी नसेल तर आरोग्यावर परिणाम होणारच. शाळेची ही समस्या मुलांनी समितीच्या बैठकीत मांडली. **जन आरोग्य समितीने जिल्हा परिषदेसोबत पाठपुरावा करून दोन वर्षांपासून प्रलंबित असणारा प्रश्न आठ दिवसात सोडवला. आणि मुला-मुलींना व शाळेला नवीन कोरे स्वच्छतागृह मिळाले.**

## समितीचा स्थानिक संसाधने आणि निधी वापरावर भर...

पुणे जिल्हा । आंबेगाव तालुका । शिनोली उपकेंद्र

आरोग्य केंद्रातील काही मुद्दे खूप छोटे-छोटे असतात. मात्र, आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्यासाठी हे मुद्दे वर्षानुवर्षे येत असतील तर त्याचा त्रास होतो.

उदा. शिनोली उपकेंद्रात पावसात गळतीमुळे बऱ्याच अडचणी निर्माण होत होत्या, उपकेंद्रात बसण्यासाठी अतिरिक्त खुर्च्यांची गरज नेहमी लक्षात येत होती, समितीच्या मासिक बैठकीतही सर्वांना बसण्यासाठी जागा अपुरी असायची. इत्यादी.

जन आरोग्य समितीनंतर वरील प्रकारच्या दोन-तीन मुद्यांवर आधी भर देण्यात आला. सप्टेंबर २०२३ च्या बैठकीत उपकेंद्राच्या **छताची दुरुस्ती आणि निधीचे नियोजन ग्रामपंचायत मार्फत करण्याचा निर्णय झाला. जन आरोग्य समितीतील एका सद्स्यामार्फत पाच नवीन खुर्च्या घेण्यात आल्या.** याप्रकारे स्थानिक संसाधने आणि निधी वापराबद्दल सर्वच बैठकांमध्ये



## दर महिन्याला पुढील दिनदर्शिकेनुसार नमूद केलेल्या दिवसांच्या निमित्ताने ‘जन आरोग्य समिती’ची बैठक घेऊ शकता.

| क्र. | तारीख | दिवस |
|---|---|---|
| १. | १२ जानेवारी | राष्ट्रीय युवा दिन |
| २. | ३० जानेवारी | कुष्ठरोग विरोधी दिन |
| ३. | ४ फेब्रुवारी | जागतिक कर्करोग दिन |
| ४. | १० फेब्रुवारी | राष्ट्रीय जंतनाशक दिन |
| ५. | ११ फेब्रुवारी | आंतरराष्ट्रीय एपिलेप्सी (अपस्मार) दिवस |
| ६. | ८ मार्च | आंतरराष्ट्रीय महिला दिन |
| ७. | २४ मार्च | जागतिक क्षयरोग दिन |
| ८. | ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन |
| ९. | ११ एप्रिल | राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिन |
| १०. | १४ एप्रिल | आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी दिन |
| ११. | ५ मे | आंतरराष्ट्रीय सुईणी/दाई दिन |
| १२. | १२ मे | आंतरराष्ट्रीय परिचारिका / नर्स दिन |
| १३. | ३१ मे | जागतिक तंबाखू विरोधी दिन |
| १४. | २१ जून | आंतरराष्ट्रीय योग दिन |
| १५. | १ जुलै | डॉक्टर दिन |
| १६. | १५ ऑगस्ट | स्वातंत्र्यदिन |
| १७. | ०१-०७ सप्टेंबर | राष्ट्रीय पोषण सप्ताह |
| १८. | १० ऑक्टोबर | जागतिक मानसिक आरोग्य दिन |
| १९. | १२ नोव्हेंबर | जागतिक न्यूमोनिया दिन |
| २०. | १२ डिसेंबर | युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज डे (सर्वांसाठी आरोग्य) |

## जन आरोग्य समितीची रचना – उपकेंद्र (HWC)

**अध्यक्ष**

उपकेंद्र कार्यक्षेत्रातील ग्रा.प. सरपंच

**सहअध्यक्ष**

प्रा.आ.केंद्राचे वैद्यकीय अधिकारी

**सदस्य सचिव**

सी.एच.ओ HWC

**सदस्य**

- ग्रा.आ.पो.पा. स्व. समितीचे समितीचे अध्यक्ष
- कार्यक्षेत्रातील इतर ग्रामपंचायतीचे सरपंच
- आशा कार्यकर्ती/ अंगणवाडी सेविका
- आरोग्य कर्मचारी (ANM/MPW)
- इतर सदस्य
  - स्थानिक शाळा शिक्षक
  - बचत गट – अध्यक्ष
  - आरोग्य दूत
  - विशेष आमंत्रित

- उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये एकापेक्षा अधिक सरपंच कार्यरत असल्यास अशा वेळी उपकेद्र असलेल्या गावातील सरपंच यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांची अध्यक्ष पदावर नेमणूक करणे. किमान दोन वर्ष त्यांचा कार्यकाल राहील.

- एका पेक्षा अधिक VHNSC अध्यक्ष असल्यास नियमाप्रमाणे किमान दोन वर्षासाठी आळीपाळीने (फिरता क्रम) सदस्य राहता येईल.

## जन आरोग्य समितीची रचना - प्रा. आ. केंद्र (HWC)

**अध्यक्ष**

संबधित कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद सदस्य

**सहअध्यक्ष**

तालुका वैद्यकीय अधिकारी

**सदस्य सचिव**


प्रा.आ.केंद्राचे वैद्यकीय अधिकारी

**सदस्य**

- प्राथमिक आरोग्य केंद्राचे आयुष / प्रभारी वैद्यकीय अधिकारी
- वरिष्ठ स्टाफ नर्स / महिला आरोग्य कर्मचारी / ए.एन.एम
- ग्रामपंचायत आरोग्य उपसमितीचे अध्यक्ष (ग्रामपंचायत सदस्य)
- DWCD/ICDS तालुका क्षेत्रिय पर्यवेक्षक / पर्यवेक्षिका / सुपरवायझर
- तालुकास्तरीय शिक्षण विभागाचे
  - अधिकारी
  - प्राचार्य
  - मुख्याध्यापक
  - वरिष्ठ शिक्षक

**समिती सदस्याची निवड ग्रामपंचायत सभेद्वारे करण्यात यावी.**

- प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्र उपकेंद्र स्तरावरील जन आरोग्य समितीचे अध्यक्ष(किमान ५ ते ६ प्रतिनिधी असू शकतात.)
- नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेचे दोन प्रतिनिधी (आरोग्य विषयक कामकाज हाताळणी करणारे प्रतिनिधी)
- विशेष आमंत्रित - क्षयरोगाने मुक्त झालेला एक, दोन मुलांनंतर नसबंदी केलेला कोणताही पुरुष, आणि व्ही. एच.एन.एस.सी चेअरमन / सदस्य, अध्यक्ष बचत गट, युथ ग्रुपमधील सदस्य फिरत्या क्रमनुसार.



राष्ट्रीय आरोग्य अभियान आयुष्मान भारत योजनेंतर्गत उपकेंद्र (Sub Centre) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र (Primary Health Centre) मध्ये जन आरोग्य समिती स्थापन करुन कार्यान्वित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-११२२/प्र.क्र.५४/आरोग्य-७
१० वा मजला, गो. ते. रुग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२२.

वाचा :-

१) सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/रुकस कक्ष/जन. आ.स/शा.नि.मसुदा/६४०९३/२०२२, दिनांक १३.०६.२०२२.
२) मा.अपर सचिव व अभियान संचालक (NHM), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.D.O.No.Z-18015/42020-NHM-III (Part III), दिनांक २३.१०.२०२०.
३) प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील रुग्ण कल्याण समिती शासन निर्णय क्र.NRHM-2005/44/C.R.426/PH-6, दिनांक ३१.०१.२००७.
४) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.राग्राअ-२००९/प्र.क्र.१९६/आरोग्य-७अ, दिनांक २८.०८.२००९

प्रस्तावना:-

केंद्र शासनामार्फत राज्यात आरोग्य सेवांमधील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयुष्मान भारत योजनेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) व उपकेंद्र (Sub Centre) आयुष्मान भारत योजनेंतर्गत आरोग्यवर्धिनी केंद्रात रुपांतरीत करण्यात आली आहेत. अशा आरोग्यवर्धिनी केंद्राच्या कार्यक्षेत्रातील लोकांना वेगवेगळया प्रकारच्या प्रतिबंधात्मक, प्रसारक, उपचारात्मक, पुनर्वसनात्मक आणि उपशामक/वृध्दापकालीन काळजी (Palliative Care) आरोग्य सेवा प्रदान करण्याचे प्रथम संपर्क ठिकाण बनविणे अपेक्षित आहे. आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत जन आरोग्य सेवा देण्याची महत्वपूर्ण भुमिका बजाविणे आणि आरोग्यावर परिणाम करणाऱ्या सामाजिक व पर्यावरणात्मक घटक यांच्यासाठी एकत्रित सामुदायिक कृतीवर लक्ष केंद्रीत करणे, सामाजिक जबाबदारी व सामुहीक प्रतिसादाच्या प्रक्रियेस सहाय्य करणे हे अपेक्षित आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र आणि त्यावरील/ पुढच्या स्तरावरील आरोग्य संस्थांमध्ये रुग्ण कल्याण समितीची स्थापना संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे. आरोग्य सेवेमध्ये सक्रीय लोकसहभागास प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक पातळीवरील एक प्रभावी संस्थात्मक यंत्रणा म्हणून रुग्ण कल्याण समितीला पाहिले जाते. रुग्ण











**'आरोग्यवर्धिनी केंद्र' व 'जन आरोग्य समिती'च्या सक्रिय सहभागाची क्षणचित्रे**




- संकलन व लेखन
  भाऊसाहेब आहेर / हेमराज पाटील
- मुद्रण
  एन. आर. एंटरप्रायझेस, पुणे
- फेब्रुवारी, २०२४
- प्रकाशक –
  साथी (Support for Advocacy & Training to Health Initiatives)
  फ्लॅट नं. ३ व ४, अमन-ई टेरेस सोसायटी,
  डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे – ४११०३८;
  फोन- (०२०) २५४७३५६५, २५४७२३२५
- ई-मेल
  sathicehat@gmail.com
- वेबसाईट
  www.sathicehat.org



साभार –

१. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: एनएचएम-११२२/प्र.क्र.५४/आरोग्य-७ दिनांक २३ नोव्हेंबर २०२२.

२. Community ownership of health and wellness centres guidelines for Jan -rogya Samiti. (GOI)


‘राष्ट्रीय आरोग्य अभियान’ अंतर्गत,
‘कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ’ (CAH) प्रक्रिया, महाराष्ट्र

SATHI Pune | SATHI Pune | @SATHI_Pune
SATHI PUNE | SATHI.Pune | sathicehat.org

साथी हेल्पलाईन- ९४२२३२८५७८
सोमवार ते शुक्रवार – सकाळी १० ते सायं ६ पर्यंत